जमीन

सशस्त्र दलातील कर्मचारी/ माजी सैनिक यांना निवासी प्रयोजनासाठी शासकीय जमीन प्रदान करणेबाबत..

राज्य सैनिक मंडळाच्या शिफारसीबाबत..

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक: संकीर्ण. १०९७/११०२/प्र.क्र.५०/९७/ज-१
मंत्रालय, मुंबई: ४०० ०३२.

दिनांक:- ८.७.१९९८

वाचावे - शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक एलएनडी. १०६७/८३२५७-अे-१, दिनांक २८ जुलै १९७२.

शासन निर्णय -

उपरोक्त उल्लेखित शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दिनांक २८ जुलै १९७२ अन्वये सशस्त्र दलातील कर्मचारी, त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्ती व माजी सैनिक सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापून निवासी प्रयोजनासाठी भूखंड मिळण्यासाठी अर्ज करु शकतील अशा व्यक्तींच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेला इतर गोष्टी समान असल्यास इतर सहकारी गृहनिर्माण संस्थांपेक्षा प्राधान्य द्यावे तसेच ज्या गावात सशस्त्र दलातील कर्मचारी माजी सैनिक यांची संख्या जास्त आहे त्या गावातील गावठाणवाढ करताना काही भूखंड राखीव ठेवण्यात यावेत अशा भूखंडासाठी पूर्ण बाजारभावाची किंमत घेण्यात यावी अशा प्रकारचे आदेश देण्यात आले होते.

२. राज्य सैनिक मंडळाची बैठक दिनांक ६ जून १९९६ रोजी मा. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झाली आहे. या बैठकीच्या कार्यवृत्तातील शिफारस क्रमांक १७[ग] पुढीलप्रमाणे असून ती शासनाने मान्य केली आहे:-

> " माजी सैनिकांना सहकारी गृहनिर्माण संस्थांसाठी भूखंड/जागा-ज्या ज्या ठिकाणी गांवपातळीवर जागा उपलब्ध आहेत त्या त्या ठिकाणी जिल्हाधिकारी यांच्या अधिकारात किमान एक गुंठा देण्यात यावा."

जिल्हाधिकारी कार्यालय
रत्नागिरी.

परिच्छेद २ मध्ये नमूद केलेली मागणी ही परिच्छेद १ मध्ये नमूद केलेल्या शासन निर्णयातील तरतूदींच्या चौकटीत बसणारी आहे. सबब, सर्व जिल्हाधिका-यांना सूचना देण्यात येत आहेत की, गाव पातळीवर निवासी जमीन उपलब्ध असल्यास जिल्हाधिका-यांनी त्यांच्या अधिकारात किमान एक गुंठा जमीन अर्जदार माजी सैनिकांना देण्याबाबतची कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[शोभा मत्रे]
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग.

सोबत- शासन निर्णय, महसूल व वन विभाग,